# प्रमुख धोरणात्मक उपक्रम, सुरू केलेल्या नवीन योजना / कल्पना आणि घेतलेले निर्णय

माजी सैनिक कल्याण विभागाने माजी सैनिक आणि त्यांच्या अवलंबितांना आवश्यक तो दिलासा देण्यासाठी गेल्या आठ वर्षांमध्ये खालील प्रमुख धोरणात्मक निर्णय आणि उपक्रम सुरू केले आहेत :-

## (i) पेन्शन (PENSION)

- भारत सरकारने नोव्हेंबर 2015 मध्ये वन रँक वन पेन्शन (OROP) लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आणि माजी सैनिकांची दीर्घकाळ प्रलंबित मागणी असलेल्या OROP च्या अंमलबजावणीसाठी दिनांक 7.11.2015 रोजी आदेश जारी केले. सरकार 4थ्या, 5व्या आणि 6व्या वेतन आयोगाच्या कालावधीत (केवळ खलाशांसाठीच्या 3ऱ्या वेतन आयोगासह) विविध पदांवर सेवानिवृत्त/मृत्यू झालेल्या सशस्त्र दलातील कर्मचाऱ्यांसाठी काल्पनिक वेतन निश्चित करण्यासाठी दिनांक 17.10.2018 रोजी पत्राद्वारे OROP जारी करून OROP लागू केली आहे. त्यानुसार OROP वरील दिनांक 7.11.2015 या सरकारच्या आदेशामुळे 25 लाख संरक्षण निवृत्ती वेतनधारकांपैकी 20.60 लाख माजी सैनिकांना याचा लाभ मिळाला आहे. OROP च्या अंमलबजावणीमुळे 20,60,220 डिफेन्स फोर्स पेन्शनधारकांना थकबाकी म्हणून रु.10795.4 कोटी वितरित करण्यात आले आहेत. यासाठी वार्षिक अंदाजे आवर्ती खर्च सुमारे रु.7123 कोटी आहे.

- फेब्रुवारी 2020 मध्ये 2006 पूर्वीच्या सेवानिवृत्त ऑनररी नायब सुभेदार (HNS) ची दीर्घकाळ प्रलंबित मागणी सरकारने पूर्ण केली. दिनांक 1.1.2006 नंतरच्या निवृत्त हवालदारांच्या निवृत्ती वेतनाच्या सुधारणेचा लाभ ज्यांना नायब सुभेदारांचा मानद दर्जा बहाल करण्यात आला होता त्यांना 1.1.2006 पासून 2006 पूर्वीच्या निवृत्त हवालदारांना नायब सुभेदारांची मानद रँक देण्यात आली होती. वर्ष 2006 पूर्वीच्या अंदाजे 75,250 निवृत्त ऑनररी नायब सुभेदार यांना या निर्णयाचा फायदा झाला आहे.

- 7 वर्षांपेक्षा कमी पात्रता सेवा असताना मरण पावलेल्या/अवैध झालेल्या सशस्त्र दलातील कर्मचाऱ्यांना सामान्य कौटुंबिक निवृत्ती वेतनाच्या वाढीव दरासाठी किमान 7 वर्षांची सतत सेवेची अट काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापुढे दि. 01 ऑक्टोबर 2019 च्या आधी दहा वर्षांच्या आत 7 वर्षांची सेवा पूर्ण न झालेल्या संरक्षण दलातील जवानांचा मृत्यू झाल्यास, त्यांचे कुटुंब देखील दिनांक 1.10.2019 पासून वाढीव दराने कौटुंबिक पेन्शनसाठी पात्र असेल.

- माजी सैनिक/पेन्शनधारकांच्या तक्रारींवर लक्ष ठेवण्यासाठी विभागाकडे पेन्शन तक्रार निवारण कक्ष (Pension Grievance Cell) आहे, ज्यामुळे तक्रार निवारण प्रणाली व्यवस्थितरीत्या सुरू आहे. तक्रारी निकाली काढण्याची एकूण टक्केवारी 97% आहे. सतत पाठपुरावा, संबंधित कार्यालयांशी नियमित संवाद तसेच साप्ताहिक आढावा यामुळे हे साध्य झाले आहे. वरील सूचित उपक्रमांचा परिणाम, तक्रारींचे निराकरण आणि तंत्रज्ञानाच्या वापरासाठी 30 दिवसांच्या कमी कालावधीचे काटेकोर पालन केल्यामुळे तक्रारींचे निराकरण आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे निकालाची सरासरी वेळ 2014 मधील 87 दिवसांवरून 2018 मध्ये 25 दिवसांवर आणली गेली आणि 2020-21 मध्ये 21-27 दिवसांपर्यंत कमी झाली. 2020-21 मध्ये 27 दिवस. उपरोक्त केलेले प्रयत्न आमच्या तक्रारी कमी करण्यासाठी, निकालाची वेळ कमी करण्यासाठी आणि आमच्या माजी सैनिकांशी संवाद आणि परस्पर संवादाला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच माजी सैनिकाच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी राज्य सैनिक मंडळे (RSBs)/ जिल्हा सैनिक मंडळांना (ZSBs) कार्यशील करण्यासाठी आमच्या एकत्रित प्रयत्नांना अधोरेखित करतात.

- सरकारने असा निर्णय घेतला आहे की निवृत्त निवृत्तीवेतनधारकाचे जीवन प्रमाणपत्र शारीरिक किंवा अन्यथा (बायोमेट्रिक किंवा जीवन प्रमाणपत्राद्वारे) ग्रॅच्युइटी, पेन्शनचे कम्युटेड व्हॅल्यू, एक्स-ग्रेशिया पेमेंट, मासिक पेन्शन इत्यादीसाठी आवश्यक नाही. पेन्शन प्रशासन (रक्षा) द्वारे पेमेंट वितरित केले जाईल ज्याला स्पर्श (SPARSH) ऍप्लिकेशन म्हणून ओळखले जाते.

- अशा अपंग मुलाचे/भावंडाचे कुटुंब निवृत्तीवेतन व्यतिरिक्त इतर स्त्रोतांचे एकूण मासिक उत्पन्न रु.9000/- पेक्षा जास्त नसेल तर अपंग मूल/भाऊ कौटुंबिक पेन्शनसाठी पात्र होते. आता, भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाने दिनांक 28.09.2021 च्या पत्राद्वारे मानसिक किंवा शारीरिक अपंगत्व असलेल्या मुलांना/भावंडांना कुटुंब निवृत्ती वेतन देण्यासाठी उत्पन्नाचे निकष वाढवण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्यानुसार असे मूल/भाऊ कुटुंब निवृत्ती वेतनासाठी आजीवन पात्र असतील., कौटुंबिक निवृत्तीवेतनाव्यतिरिक्त इतर स्त्रोतांमधून त्याचे/तिचे एकूण उत्पन्न सामान्य दराने पात्र कुटुंब निवृत्ती वेतनापेक्षा कमी राहिल्यास, म्हणजे संबंधित मृत सरकारी कर्मचारी/पेन्शनधारकाने घेतलेल्या शेवटच्या वेतनाच्या 30% तसेच त्यावर महागाई भत्ता अनुज्ञेय राहील. अशा प्रकरणांमध्ये आर्थिक लाभ दिनांक 08.02.2021 पासून लागू होतील.

- केंद्राच्या 7 व्या वेतन आयोगानुसार सर्वोच्च वेतन रु. 2,50,000/- p.m सुधारित केले आहे. त्यानुसार निवृत्तीवेतन आणि निवृत्तीवेतनधारक कल्याण विभागाने (DoP&PW) दोन्ही पालकांच्या संदर्भात मुलाला/मुलांना देय असलेल्या दोन कौटुंबिक निवृत्ती वेतनाची कमाल मर्यादा रु. 1,25,000/- p.m. (2,50,000/- सामान्य कौटुंबिक पेन्शन पैकी 50% वर्धित दराने) आणि रु. 75,000/- p.m. (रु.2,50,000/- सामान्य कुटुंब निवृत्ती वेतनाच्या 30%) संरक्षण मंत्रालयाने दिनांक 29.10.2021 च्या आदेशाद्वारे सर्व सशस्त्र दलातील कर्मचाऱ्यांना दिनांक 01.01.2016 पासून वाढवले आहे.

- माजी सैनिक आणि त्यांच्या अवलंबितांच्या कौटुंबिक पेन्शन-संबंधित तक्रारींचे जलद निवारण करण्यासाठी रक्षा पेन्शन तक्रार निवारण पोर्टल (https://rakshapension.desw.gov.in) दिनांक 14.01.2022 रोजी सुरू करण्यात आले आहे. पोर्टल DESW द्वारे तक्रारींवर त्वरित कार्यवाही करण्यास सक्षम ठरेल. पोर्टलद्वारे, अर्जदारांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाइल नंबर आणि ई-मेलवर एसएमएस आणि ई-मेल पाठवले जातील, तक्रारीच्या नोंदणीची पुष्टी करण्यासाठी आणि त्याची स्थिती ट्रॅक करण्यासाठी तक्रारींचे निवारण करण्याच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने अर्जदार अभिप्राय देखील देऊ शकतात.

## कल्याण (WELFARE)

- आर्थिक वर्ष 2021-22 मध्ये सशस्त्र सेना ध्वज दिन निधी (AFFDF) साठी रू.320 कोटी रुपयांची तरतूद जानेवारी 2022 मंध्ये करण्यात आली आहे. यामुळे शैक्षणिक अनुदानाच्या प्रलंबित रू.1.58 लाख अर्जांच्या संदर्भात सर्व अनुशेष दूर होतील. मे २०१८ पर्यंत रु. २८४.०० कोटी आणि रु. ३६.०० कोटी माजी सैनिकाच्या मुलींचे विवाहाचे आर्थिक मदतीचे ७५८३ अर्ज फेब्रुवारी २०२० पासून प्रलंबित आहेत. सदर तरतुदीमुळे एकूण 1.66 लाख माजी सैनिक/अवलंबितांना फायदा होणार आहे.

- माहे मे 2020 मंध्ये आर्मी बॅटल कॅज्युअल्टीज वेलफेअर फंड (ABCWF) चे नाव बदलून सशस्त्र सेना बॅटल कॅज्युअल्टीज वेलफेअर फंड (AFBCWF) असे करण्यात आले आहे. यामुळे हवाई दल आणि नौदलाच्या युद्धातील शहीद/जख्मींना लाभ देण्यासाठी करण्यात आले आहे. सर्व युद्धातील शहीदांसाठी अतिरिक्त सानुग्रह रक्कम सध्याच्या रु. 2 लाखांवरून रु. 8 लाख करण्यात आली आहे, तसेच युध्दातील जखमी सैनिकांसाठी सध्याची आर्थिक मदत रू. 1 लाखावरून रुपये 4 लाख करण्यात आली आहे.

- आर्थिक वर्ष 2019-20 पासून पंतप्रधान शिष्यवृत्ती योजनेचा (PMSS) मुलांसाठी प्रति वर्ष रुपये 24,000 वरून रू.30,000/- प्रति वर्ष आणि मुलींसाठी रुपये 27,000 प्रति वर्ष वरून रुपये 36,000/- प्रतिवर्ष करण्यात आली आहे.

- रक्षामंत्री माजी सैनिक कल्याण निधी (सशस्त्र सेना ध्वज दिन निधीतून निधी) अंतर्गत माजी सैनिक/विधवांच्या 100% अपंग मुलांना रुपये 1000 वरून रुपये 3000 दरमहा आर्थिक मदत दिनांक 1 ऑगस्ट 2021 पासून करण्यात आली आहे.

- केंद्रीय सैनिक बोर्ड (KSB) यांची डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (DBT) भारत ही सेवा व (युनिफाइड मोबाईल ॲप्लिकेशन फॉर न्यू-एज गव्हर्नन्स) उमंग मोबाईल पोर्टलवर यशस्वीरित्या कार्यान्वित झालेल्या आहेत.

- राज्य/केंद्रशासित प्रदेशातील माजी सैनिकांच्या कल्याणासाठी अरुणाचल प्रदेश आणि लदाख (UT) येथे राज्य सैनिक बोर्ड (RSBs) ची स्थापना करण्यात आली आहे.

- चेशायर होम्स या संस्था कुष्ठरुग्ण, मानसिकदृष्ट्या अपंग रूग्ण आणि क्रॉनिक स्पास्टिक/पॅराप्लेजिक आणि टीबी रूग्णांची काळजी घेतात. केंद्रीय सैनिक बोर्ड (KSB) द्वारे दिल्ली आणि लुचनौ येथील चेशायर होम्स आणि राफेल रायडर इंटरनॅशनल चेशायर होम, डेहराडून यांना दिनांक 01.04.2021 पासून प्रति रूग्ण रु 9,000/- वरून अनुदानाची रक्कम रु. 15,000/- करण्यात आली आहे.

## (iii) पुनर्वसन (RESETTLEMENT)

- सुरक्षेशी संबंधित नोकऱ्यांव्यतिरिक्त इतर क्षेत्रात माजी सैनिकांसाठी अधिक रोजगार निर्माण करण्यासाठी तांत्रिक सेवांसारख्या क्षेत्रात नवीन रोजगार योजना सुरू करण्यासाठी विभाग प्रयत्नशिल आहे. दिनांक 6.2.2020 रोजी DGR पॅनेल राज्य ESM कॉर्पोरेशन्सद्वारे सरकारी आस्थापने/संकुलांना 'तांत्रिक सेवा' साठी ESM मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी DGR योजनेच्या कामकाजासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत.

- प्रारंभिक कालावधी पूर्ण केल्यानंतर मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणाऱ्या शॉर्ट सर्व्हिस कमिशन्ड अधिका-यांना माजी सैनिकाचा (ESM) दर्जा देण्याबाबत अधिसूचना दिनांक १६.२.२०२० रोजी जारी करण्यात आली. यामुळे शॉर्ट सर्व्हिस कमिशनद्वारे प्रवेश अधिक आकर्षक होईल.

- शॉर्ट सर्व्हिस कमिशन (SSC) सेवेतून मुक्त झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी लष्करी पदांचा वापर करण्याची प्रदीर्घ प्रलंबित मागणीही सरकारने मान्य केली आहे. या विषयावरील दिनांक 27.07.1983 च्या पूर्वीच्या शासन आदेशात दिनांक 23.03.2021 च्या शुद्धीपत्राद्वारे बदल करण्यात आला आहे ज्या योगे सैन्याच्या एसएससी अधिकाऱ्यांना सेवेतून मुक्त झाल्यानंतर त्यांच्या लष्करी पदांचा वापर करण्याची परवानगी दिली गेली आहे. बशर्ते ते माजी सैनिकांचा दर्जा मिळविण्यास पात्र असतील (ईएसएम). हा निर्णय एसएससीला अधिक आकर्षक बनवण्यासोबतच तरुण इच्छुक आणि विद्यमान एसएससी अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देईल.

- सुरक्षा एजन्सींच्या कार्यासंबंधित अधिक पारदर्शकता आणि स्पर्धात्मकता आणण्यासाठी डीजीआर पॅनेलने केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सर्वसमावेशक सुधारणा करण्यात आली आहे आणि CPSEs (Central Public Sector Enterprises) अधिक किफायतेशीर बनवण्यासाठी सेवा शुल्क देखील कमी करण्यात आले आहे.

## आरोग्य सेवा (HEALTHCARE)

- फेब्रुवारी 2019 मध्ये सरकारने भारत आणि नेपाळमध्ये राहणाऱ्या आसाम रायफल्स पेन्शनधारकांना आणि त्यांच्या अवलंबितांना माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजना (ECHS) सुविधा देण्याचे आदेश जारी केले. या सुविधांचा लाभ द्वितीय विश्वयुद्धातील माजी सैनिक, आणीबाणी आयोग अधिकारी (ईसीओ), शॉर्ट सर्व्हिस कमिशन्ड ऑफिसर्स (एसएससीओ) आणि मार्च 2019 मध्ये प्री-मॅच्युअर सेवानिवृत्त झालेल्या माजी सैनिकांना लागू करण्यात आला आहे.

- आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या दिनांक 1.1.2020 रोजीच्या कार्यालयीन आदेशातील तरतुदींच्या अनुषंगाने संरक्षण मंत्रालयाच्या दिनांक 8.7.2020 रोजीचा आदेशानुसार 25 वर्षांचे वय झाल्यानंतर उद्‌भवलेल्या ECHS लाभार्थ्यांच्या मुलांसाठी अपंगत्वाची प्रकरणे देखील विचारात घेतली जाऊ शकतात. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या दिनांक 7.5.2018 रोजीच्या आदेशात नमूद केलेल्या काही अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून ECHS अंतर्गत औषधोपचाराचा लाभ संबंधितांना अवलंबित म्हणून देण्यात येईल.

- सध्या सुरू असलेल्या कोविड-19 साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर आणि ECHS लाभार्थ्यांची कोरोना विषाणूची असुरक्षितता लक्षात घेऊन तसेच ECHS पॉलीक्लिनिकमध्ये कमीत कमी होणारी संख्या लक्षात घेता, रेफरलशिवाय औषधांच्या खरेदी आणि प्रतिपूर्तीसाठी विशेष मंजुरी वाढवण्याचा निर्णय विविध शासकीय आदेशांन्वये पॉलिक्लिनिकव्दारे घेण्यात आला आहे.

- माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजना (ECHS) लाभार्थ्यांना मोठा दिलासा म्हणून, सरकारने दिनांक 25.3.2022 च्या पत्राद्वारे उपलब्ध नसलेल्या (NA) औषधांच्या खरेदीसाठी 15 दिवसांवरून 30 दिवसांपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वसाधारण परिस्थितीत खुल्या बाजारातील प्रतिपूर्ती आधारावर एक वेळ खरेदी केलेल्या औषंधांची एकूण किंमत रु. 25,000/- पेक्षा जास्त नसावी आणि विशेष परिस्थितीत ती रु. 75,000/- पर्यंत करण्यात आली आहे. कर्करोगाच्या औषधे खरेदीसाठी असणारी मर्यादा ही प्रत्येक वेळी रु. २ लाख वरून वाढवून रु. 5 लाख करण्यात आली आहे.

- हिमाचल प्रदेश आणि ओडिसा राज्यांमधील मागासलेल्या आणि दुर्गम भागात मोठ्या संख्येने ECHS लाभार्थींसाठी येवूल आणि भुवनेश्वर येथे दोन नवीन प्रादेशिक केंद्रे 2021 मध्ये कार्यान्वित करण्यात आली.

*********